(३८)

जा.क्र.का.१२/मु.प.सं/१८/२०११/परतावा/९८३/१९
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
नविन प्रशासकीय इमारत, पुणे ०१.
दिनांक :- १३ / ०७ /०११

विषय :- मुद्रांक परतावा मंजूर करण्याच्या प्रकरणी मुद्रांकाच्या खरेपणाबाबत छानती करणे.

**परिपत्रक**

मुंबई मुद्राक अधिनियम १९५८ च्या कलम ५२ अ (१)(२)(३) अन्वये मुद्रांकाचा परतावा देण्याच्या प्रकरणांवर निर्णय घेण्यापूर्वी संबंधित मुद्रांक बनावट नाहीत याची खातरजमा केली जाणे आवश्यक आहे, अशा शासनाच्या वित्त विभागाच्या सूचना असल्याने या कार्यालयाचे परिपत्रक क्र. का.१२ / मु / परतावा / १९९०-६२ / दि.१३/५/१९९३ अन्वये परिपत्रक निर्गमित केले आहे. सप्टेंबर १९९४ पासून उमट मुद्रांक कार्यप्रणाली चालू झालेली आहे, या उमट मुद्रांका संदर्भातील खरेपणाबाबत देखील पडताळणी करणे आवश्यक झाले आहे. सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व अप्पर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांनी फ्रँकिंग केलेल्या मुद्रांकाबाबत खालील निष्कर्षाप्रमाणे काळजीपूर्वक छानती करुन ज्या फ्रॅकिंग मुद्रांकामध्ये साशंकता निर्माण होणार नाही अशा मुद्रांकाचा परतावा देण्याबाबत निर्णय घ्यावा. त्यामुळे प्रस्तावित परिपत्रक खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.

१) परवानाधारक मुद्रांक विक्रेत्याकडूनच फ्रँकिंग करुन घेण्यात आले आहे, W ?
२) मुद्राक विक्रेत्याचे विक्री रजिस्टरला संबंधित फ्रँकिंगची नोंद असल्याबाबत Authorised Signatory चे प्रमाणपत्र, आहे का ?
३) मुद्रांक विक्रेत्याकडून हायपर टर्मिनल रिपोर्ट प्राप्त झाला आहे, का ?
४) मुद्रांक विक्रेत्याचे लेटर हेडवर प्रमाणपत्र प्राप्त आहे. का ?
५) अल्ट्राव्हायलेट लॅम्पद्वारे मुद्रांकाची तपासणी केली आहे. का ?
६) मुद्राक विक्रेत्याकडून फ्रँकिंग झालेल्या मुद्रांकांच्या मुळ ink cartridge ची तेवढ्यापुरती छायाप्रत घेतलेली आहे का ?
७) त्याचप्रमाणे संबंधित विक्रेत्याने सदरचे मुद्रांक भरणेपूर्वी त्याकरीता आवश्यक कोड लोडींग योग्य प्रकारे केले असून त्याची रक्कम शासन जमा झाल्याबाबत संबंधित कार्यालयाकडून खात्री करुन तसे प्रमाणपत्र उपलब्ध करुन घेतले आहे का ?

परताव्यातील मुद्रांकाची सत्यता वरील निष्कर्षानुसार तपासताना वरिल प्रमाणे कागदोपत्री

पुराव्यापैकी एकजरी पुराव्याबाबत साशंकता निर्माण झाल्यास अथवा संबंधित अभिलेख/ कागदपत्रापैकी एख़ादा अभिलेख/कागदपत्र उपलब्ध न झाल्यास सदर मुद्रांक त्याच्या सत्यतेच्या पडताळणीसाठी मे. पिटने बाऊज कंपनीकडे पाठविणे आवश्यक आहे व त्यांचेकडून सत्यता पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर अशा साशंकता निर्माण झालेल्या /अर्धवट अभिलेख उपलब्ध असलेल्या प्रकरणाबाबत पुढील निर्णय घेणे आवश्यक राहील.

परताव्याबाबत या कार्यालयास प्रस्ताव पाठविताना सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक, व अप्पर मुद्रांक नियंत्रक मुंबई यांचेकडून वरीलप्रमाणे मुद्रांकाची पडताळणी होऊनच प्रस्ताव प्राप्त होणे आवश्यक आहे.तरी या कार्यालयाला प्रस्ताव पाठविताना व संपूर्ण रितीने तपासला आहे व सर्व संबंधित कागदपत्रे सदर प्रस्तावात आहेत याची खातरजमा करुन व तसे प्रमाणपत्र सोबत जोडूनच प्रस्ताव या कार्यालयाकडे पाठविण्याची सर्वांनी दक्षता घ्यावी.

**सही/-XXX**
**(एस. चोक्कलिंगम्)**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रत:-

१) अवर सचिव, महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई
२) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक
३) सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी व सह जिल्हा निबंधक
४) मुद्रांक अधिक्षक मुंबई
५) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
६) क्षेत्रिय व्यवस्थापक, मे. पिटने बाऊज इंडिया प्रा.लि.मुंबई.

२/-आपणास सुचित करणेत येते की या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे ज्या परतावा प्रकरणात साशंकता निर्माण होईल, अशी प्रकरणेच फक्त आपणाकडे यापुढे पाठविण्यायत येतील. तरी आपणाकडे प्राप्त होणारी अशी प्रकरणे प्रथम प्राधान्याने तपासून त्याचा अहवाल देवून सहकार्य करावे.

**निर्गमित,**

**(नितीन गोसावी)**
**सह नोंदणी महानिरीक्षक तथा**
**मुद्रांक अधिक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे.**